


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com




■ वर्ष ७६ वे/अंक २७२ वा ■ ■ अमरावती,गुरुवार दिनांक २१ मे २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर ३१ वैशाख १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■




# महायुतीचा जागावाटपाचा फॉर्म्यूला ठरला

## भाजपा १२, शिवसेना ३, राष्ट्रवादी २ जागांवर लढणार



मुंबई दि. २० : विधानपरिषदेच्या निवडणुकीचे बिगुल वाजताच राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्यात एकूण १६ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून हे १६ आमदार विधानपरिषदेसाठी निवडले जाणार आहेत. दरम्यान, या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर महायुतीत जागावाटपावर चर्चा सुरू झाली आहे. कोणाला किती जागा? हे महायुतीच्या घटकपक्षांमध्ये ठरवलं जात आहे. दरम्यान, आता या निवडणुकीसाठी महायुतीचे संभाव्य जागावाटप समोर आले आहे.

**महायुतीचा फॉर्म्यूला काय?**

विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी जागावाटपाचा जागावाटपाचा संभाव्य फॉर्म्यूला समोर आला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार एकूण १६ जागांपैकी १२ जागा या भाजपासाठी असतील. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला ३ जागा दिल्या जाण्याची शक्यता आहे. तर राष्ट्रवादी *(उर्वरित पान २ वर)*

# भारताच्या डोक्यावर आर्थिक वादळ घोंघावतय अन् आपले पंतप्रधान चॉकलेट वाटण्यात मश्गुल : राहुल गांधी

रायबरेली दि.२० : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या इटलीच्या दौऱ्यावर आहेत. मंगळवारी रात्री इटलीत दाखल झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी इटलीच्या झच् जॉर्जिया मेलोनी यांची भेट घेतली. यानंतर या दोघांनी रोम शहरात एक खास फोटोसेशन केले. मोदी-मेलोनींचे हे फोटो सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत. तसेच पंतप्रधान मोदी यांनी स्वत:च्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर मेलोनी यांच्यासोबत कोलॅब करत एक व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये पंतप्रधान मोदी हे इटलीच्या पंतप्रधानांना त्यांच्या नावाशी साधर्म्य असलेली मेलेडी चॉकलेटस् देताना दिसत आहेत. या व्हिडीओमध्ये दोघेही खळाळून हसताना पाहायला मिळत आहेत. याच व्हिडीओवरुन काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केली आहे. देशाच्या डोक्यावर आर्थिक वादळ घोंघावत असताना आपले पंतप्रधान *(उर्वरित पान २ वर)*



## 'हा तर १४० कोटी जनतेचा अपमान', मोदींना गद्दार म्हणणाऱ्या राहुल गांधींना भाजपने सुनावले

नवी दिल्ली दि. २० : लोकसभेचे विरोधीपक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह याच्यावर टीका करताना वादग्रस्त विधान केले आहे. यामुळे राजकीय वर्तुळात वातावरण तापले आहे. रायबरेली येथे आयोजित सभेत बोलताना राहुल गांधी यांनी मोदी आणि अमित शाह यांना गद्दार असे म्हटले होते. त्यानंतर आता भाजपने राहुल गांधींच्या या विधानाचा समाचार घेत त्यांच्यावर टीका केली.

**मोदी-शाह यांचा गद्दार असा उल्लेख**

राहुल गांधी यांनी सरायबरेली येथील सभेत बोलताना म्हटले होते की, 'हा देश सर्वांचा आहे, तो कोणत्याही एका जातीचा किंवा संघटनेचा नाही. संविधान हे देशातील जनतेचा आवाज आहे आणि त्याचे संरक्षण करणे आपले कर्तव्य आहे. भाजपने देश विकण्याचे काम केले आहे.' पुढे त्यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून म्हटले की, *(पान २ वर)*

# महाराष्ट्राची दवापाणी बंद कुठे मोर्चे तर कुठे निदर्शने, तर कुठे संताप; राज्यात केमिस्टांच्या बंदने हाल

मुंबई दि. २० : आज देशभरातील केमिस्टांनी बंदची वज्रमूठ आवळली आहे. आपल्या काही मागण्यांसाठी मेडिकल स्टोअर्स चालकांनी आज मेडिकल स्टोअर्स बंद ठेवले आहेत. या बंदला देशभरात कडकडीत प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे देशभरातील रुग्णांची दवापाणी बंद झाली आहे. महाराष्ट्रातही केमिस्टांचा बंद १०० टक्के यशस्वी झाला आहे. महाराष्ट्रातील केमिस्ट केवळ मेडिकल स्टोअर्स बंद ठेवून थांबले नाहीत. तर त्यांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने करत आपला संताप व्यक्त केला आहे. राज्यात ठिकाठिकाणी धरणे, निदर्शने आणि संताप व्यक्त केला जात आहे. तर दुसरीकडे आज मेडिकल स्टोअर्स बंद असल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत.




सोलापुरात औषध विक्रेत्यांचा मोर्चा निघाला. ऑनलाइन औषध विक्री विरोधात आज सोलापूरसह देशभरात बंद पुकारण्यात आला आहे. सोलापुरातील हुतात्मा स्मारकापासून औषध विक्रेत्यांच्या मोर्चाला सुरुवात झाली होती. यावेळी मोठ्या संख्येने केमिस्ट सहभागी झाले होते. आज माढ्यातील ६०० तर सोलापूर जिल्हातील ८५०० हून अधिक विक्रेते दुकाने बंद करुन काळ्या फिती लावून संपात सहभागी झाले होते.

करमाळयातील औषध विक्रेत्यांनी आक्रमक होत सरकारविरोधात घोषणाबाजी केली. आमच्या मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत संपावर जाण्याचा इशारा औषध विक्रेत्यांनी दिला आहे. रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी करमाळयातील दोन मेडिकल खुली ठेवण्यात आल्याची माहिती औषध विक्रेत्यांनी दिली.

पुण्यातील रस्ता पेठ येथील पावर हाऊस चौकात औषध विक्रेत्यांचे *(उर्वरित पान २ वर)*

# विदर्भात उष्णतेचा हाहा:कार

## वर्ध्यात ४७.१, चंद्रपूर ४६.२, तर अमरावतीत ४६.४ सेल्सिअस तापमानाची नोंद

नागपूर दि. २० : राज्यात उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून विशेषतः विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये सूर्य कोपल्याचे चित्र आहे. विदर्भात तापमानाचा पारा कमालीचा वाढला असून वर्धा येथे तब्बल ४७.१ अंश सेल्सिअस एवढ्या विक्रमी तापमानाची नोंद झाली आहे. त्याखालोखाल अमरावती (४६.४ सेल्सिअस) आणि चंद्रपूर (४६.२ सेल्सिअस) या जिल्ह्यांमध्येही उष्णतेची तीव्र लाट पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने नागरिकांना कडक उन्हापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी खबरदारीचा इशारा दिला आहे.

विदर्भात *(पान २ वर)*

## माहोल....




साहेब, हा माठ आहे चांगलाच आहे...नीट पेपर थोडीच आहे लीक व्हायला!

# जमीन मोजणी, गावठाण नोंदी, नगर भूमापनासाठी सरकारचा मोठा प्लॅन; ५० नवी कार्यालये, १० हजार पदांवरही मोहर : बावनकुळे

मुंबई दि. २० : जमीन मोजणी करायचीये? हद्द निश्चितीसाठी सरकारी कचेरीचे उंबरठे झिजवून पाय थकून गेलेत? मग तुमच्यासाठी एक अत्यंत गूड न्यूज आहे. राज्यातील जमीन मोजणी, हद्द निश्चिती आणि गावठाण नोंदींची रखडलेली कामे आता थेट 'बुलेट ट्रेन'च्या वेगाने मार्गी लागणार आहेत. कारण, राज्य सरकारने भूमी अभिलेख विभागाचा कायापालट करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.



राज्यात ५० नवीन कार्यालयांना मंजुरी देण्यात आली असून, तब्बल १० हजार ६८३ पदांच्या सुधारित आकृतीबंधावर मंजुरीची मोहर उमटवण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतला असून, याबाबतचा शासन निर्णय देखील जारी झाला आहे.

**सरकारने का उचललं हे पाऊल**

राज्यात ज्या वेगाने शहरीकरण वाढतंय, त्यापेक्षाही वेगाने जमिनीचे वाद आणि मोजणीच्या तक्रारी वाढत आहेत. अनेक शहरांमध्ये मोजणी आणि हद्द निश्चितीची कामे महिनोन्महिने लालफितीत अडकून पडत *(उर्वरित पान २ वर)*

### तापमान

| | | |
|---|---|---|
| अमरावती | - | ४६.४ |
| अकोला | - | ४५.२ |
| बुलढाणा | - | ४१.० |
| ब्रह्मपुरी | - | ४५.८ |
| चंद्रपूर | - | ४६.२ |
| गडचिरोली | - | ४५.६ |
| गोंदिया | - | ४४.९ |
| नागपूर | - | ४६.६ |
| वर्धा | - | ४७.१ |
| वाशिम | - | ४२.६ |
| यवतमाळ | - | ४५.२ |
| भंडारा | - | ४३.९ |

# परिश्रम ही सफलता की कुंजी मोदींसमोर हिंदीत बोलल्या जॉर्जिया मेलोनी



रोम दि. २० : इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हिंदीत भाषण करत भारत-इटली मैत्रीचं खास कौतुक केलं. 'परिश्रम ही सफलता की कुंजी' असे हिंदीत म्हणत त्यांनी दोन्ही देशांतील वाढत्या संबंधांना कष्ट आणि विश्वासाचा मजबूत पाया असल्याचं सांगितलं. त्यांच्या या वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

रोममध्ये झालेल्या द्विपक्षीय बैठकीदरम्यान *(पान २ वर)*

# नीट परिक्षा : बनावट टेलिग्राम चॅनेलवर कठोर कारवाई होणार : धर्मेंद्र प्रधान



नवी दिल्ली दि. २० : नीट परीक्षेचा पेपर फुटल्याचे प्रकरण समोर आल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. आता ही परीक्षा पुन्हा घेतली जाणार आहे. पुनर्परीक्षेबाबत केंद्र सरकार पूर्णपणे अलर्ट मोडमध्ये आले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सुरक्षा आणि गुप्तचर यंत्रणांसोबत उच्चस्तरीय बैठक घेऊन परीक्षा सुरक्षित, निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याचे निर्देश दिले आहेत. या बैठकीत शिक्षण मंत्रालय आणि छ्ढ- चे वरिष्ठ अधिकारीही सहभागी झाले होते. परीक्षेपूर्वी कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा गैरप्रकार *(उर्वरित पान २ वर)*










